# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांच्या उन्नतीविषयक विचार व कार्य

सौ. तेजस्विनी हेमंतकुमार भोसले

---

**प्रस्तावना:**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीयांना संविधान, दलितांना, वंचितांना,सामाजिक स्वतंत्र ,समता ,न्यायासाठी संघर्षाची प्रेरणा दिली. स्त्रियांना माणूस म्हणून जगता आले पाहिजे यासाठी त्यांनी मनुस्मृती ग्रंथाचे दहन केले.धर्माच्या गुलामीतून स्त्रियांची मुक्ती व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारताचे कायदेमंत्री असताना त्यांनी हिंदू कोड बील मांडले. यामधून स्त्रियांना वारसा हक्क , घटस्फोट मिळविण्याचा अधिकार महत्वाचे मानून त्यासाठी तत्कालीन समाज घुरीणांशीही संघर्ष केला. हिंदू कोड बिलावरून कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. सामाजिक समतेच्या आंदोलनात स्त्री आणि पुरुष यांना समानता मिळावी यासाठी अनेक सुधारकांनी प्रयत्न केले त्यामध्ये डॉ. बाबासाहेबांचा ही मोलाचा वाटा आहे. स्त्री समाजाचा , दालीनांचा ,उद्धार करील म्हणून तिला प्रमुख स्थान दिले पाहिजे असे त्यांना वाटत होते. स्त्रिया कर्मकांड , अंधविश्वास दूर करील यांवर त्यांचा विश्वास होता.

**उद्दिष्टे :**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री उन्नतीसाठी केलेले प्रयत्नांचा अभ्यास करणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या मुक्तीसाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, इंटरनेट, मासिक यामधील माहितीचा आधार घेतला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री उन्नती :**

स्त्रियांच्या स्वातंत्र्यसाठी त्यांच्या हक्कासाठी व त्यांना अधिकार मिळवून देण्यासाठी समाज सुधारकांनी प्रचंड विरोधाला सक्षमपणे तोंड देऊन कार्य केले. यामध्ये जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले , राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मोलाचा वाटा होता. यांच्या प्रयत्नामुळे स्त्रियांची शैक्षिणिक स्थतीमध्ये चांगले बदल झालेले दिसू लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेकरांनी स्त्रियांचे विकासाच्या दृष्टीकोनातून प्रबोधन केले.स्त्रिया जात , धर्म, रूढी , परंपरा , संस्कार यामध्ये मोठ्या प्रमाणात वाहत गेल्या होत्या. यावरून स्त्रियांना उद्धेशून महाडच्या सत्याग्रहाच्या दरम्यान केलेल्या भाषणात एक प्रश्न विचारतात, “अस्पृश्याचा निवारणाचा प्रश्न पुरुषांचा नसून तुमचा आहे , आम्हाला इतर लोक जनावरापेक्षा कमी लेखतात, ते तुम्हास ठाऊक आहे.इतका आमचा हीन दर्जा आहे हे तुम्हास ठाऊक असून असताना तुम्ही आम्हास जन्मास का घातले असा प्रश्न तुम्हास केला तर तुम्ही त्याचे उत्तर काय देवू शकाल ? अर्थात हा प्रश्न विचारून डॉ. आंबेडकरांनी अस्पुश्य स्त्रियांना जाती अंतर्गत चळवळीसाठी संघर्षाची भूमिका घेण्याची जबाबदारी टाकली.

‘भारतातील जाती’ हा ग्रंथ डॉ. आंबेडकरांनी अमेरिकेत अध्ययन करत असताना लिहित होता. (१९१६). या ग्रंथामध्ये स्त्रियांचे शोषण आणि जातीसंस्था यांच्यातील अन्योन्यसबंध स्पष्ट केले होते. जे शोषण स्त्रियांचे समाप्त केले जाते ते जातीव्यवस्थेमुळे होत असे असे दिसत होते.

तिसऱ्या दशकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या प्रश्नाबद्दल हिंदू परंपरेतील मुक्तीदायी प्रवाहावर भार दिला होता. त्यांनी महाड येथे २५ आणि २६ डिसेंबर १९२७ रोजी सत्याग्रह केला. महाड सत्याग्रहाला गोरेगाव व थोरले तंडावे येथील स्त्रियांनी वर्गणी देऊन सहकार्य केले होते. महाड मुक्ती संग्रामात ‘मानुस्मृती’ चे दहन करण्यात आले. त्यावेळच्या भाषणात मध्ये चार महत्वाचे विषय मांडले होते. एक, समाजातील अडचणी स्त्री-पुरुषांनी मिळून सोडवायला पाहिजेत. दोघांनी मिळून बहिष्कृतांच्या शोषणमुक्तीचे काम केले तर ते लवकर होईल म्हणून स्त्रियांनी चळवळीत सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. दोन, अस्पृश्यता निवारण प्रश्न पुरुषांचा नसून स्त्रियांचाही आहे. समाजातील स्त्रिया मनुष्य म्हणून समान आहेत. परंतु , उच्च जातीतील स्त्रिया आणि बहिष्कृत स्त्रिया यांच्यामध्ये भेदभाव केला जातो.या भेदभावाचा विचार करावा, असेही त्यांनी विवेचन केले. तीन, बहिष्कृत आणि उच्च जातीच्या स्त्रियांपैकी दलित स्त्रियांकडे मनोधैर्य, करारीपणा व धमक जास्त आहे. चार, त्यांनी जुन्या व गलीछया चालीरीती सोडून देण्याचे आवाहन केले. चालीरीती बहिष्कृत स्त्रियांवर सक्तीने लादल्या होत्या. इंग्रज सरकारच्या राज्यात तशी सक्ती होऊ शकत नाही. म्हणून अस्पृश्य अशी ओळख ज्या चालीरीतीमुळे होते,त्या चालीरीती बंद कराव्यात , असे त्यांनी विवेचन केले . लुगडी नेसण्याची पद्धत, गळयात भराभर गळसऱ्या व हातात कोपरभर कथलाचे किंव्हा चांदीचे गोठ, पाटल्या ही ओळखण्यासाठी खूण वापरणे ,बंद करण्याचे आवाहन डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांना केले होते. दागिन्यांवर खर्च करण्यापेक्षा कपड्यांवर खर्च करा.पाच, डॉ. आंबेडकरांनी सातत्याने स्त्रियांच्या शिक्षणाचे समर्थन केले. ‘ज्ञान आणि विद्या’ या गोष्टी केवळ पुरुषांसाठी नाहीत.त्या स्त्रियांसाठी आवश्यक आहेत.

अस्पृश्य स्त्रियांना सर्वागीण सुधारणेसाठी प्रोसाहित करताना दुसऱ्या गोलमेज परिषदेस उपस्थित राहण्यापूर्वी डॉ. आंबेडकरांनी महिलांसाठी विशेष भाषण दिले होते.त्याचा उल्लेख १७ ऑगस्ट १९३१ च्या मराठी वृत्तात देण्यात आला आहे. ‘पुरुष वर्गाला त्यांच्या करणाऱ्या कर्तव्याची जाणीव करून द्यावयाची मोठी जबाबदारी तुमच्या शिरावर आहे. पुरुष वर्गाला व्यसनापासून

अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न तुम्ही करायला पाहिजे. भावी पिढीला आजच्या गुलामगिरीचा माणूस ही दिसणार नाही अशी अलौकिक स्वर्थत्याणाची कामे आगदी निर्भयपणे तुम्ही करावयास सज्ज झाले पाहिजे अशा पद्धतीने डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांची मानसिकता तयार केली होती.

अखिल भारतीय दलित परिषदेचे तिसरे अधिवेशन नागपूरला १८,१९,२० जुलै १९४२ ला भरविण्यात आले होते. या अधिवेशनाला २० ते २५ हजार स्त्रियांचा जमाव पाहून डॉ. बाबासाहेब हर्षित झाले होते. त्यावेळी ते म्हणाले की,"एखादया समाजाच्या स्त्रियांच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. आपण एवढ्या मोठ्या संख्येने आलात, यावरून आपला समाज आता खचीतच प्रगतीच्या मार्गावर आहे, यात शंका नाही.'महिलांनी कसे वागावे व काय करावे, राहावे याबद्दल बोलताना ते म्हणाले, 'तुम्ही स्वच्छ राहा, सर्व दुर्गुणापासून दूर राहा. मुलांना शिकवून महत्वाकांशी बनवा. मुलांचे लग्न करण्याची घाई करू नका. त्यांची सहचारी बना. माझा हा सल्ला ध्यानात ठेवून वागलात तर तुमची तुम्ही उन्नती कराल आणि अस्पृश्य समाजालाही प्रगतीच्या मार्गावर न्याल.' समाजकार्यात सहभागी झालेल्या स्त्रिया पाहून डॉ.आंबेडकरांना खूप आनंद झाला. समजा बरोबर कुटुंबाला ही प्रगतीप्रथावर नेण्यास काय करावे यासाठी मार्गदशन केले.

**हिंदू कोड**

पाचव्या दशकात हिंदू कायदे संहितेबद्दलच्या घडामोडी जलदगतीने घडू लागल्या. बी. एन. राव यांच्या अध्याक्षतेखाली हिंदू लॉ सामिती नेमली (१९४१ ). या दशकात मध्यवर्ती विधिमंडळात या कायद्याला विरोध होत गेला (१९४३ -१९४७ . त्यामुळे हे बील मागे पडले होते. डॉ. आंबेडकरांनी या बिलाचा नव्याने शोध घेतला. त्यांनी हिंदू संहिता विधेयक (हिंदूकोड) तयार केले व ९ एप्रिल , १९४८ रोजी घटना समितीमध्ये सादर केले. त्याला मंत्रिमंडळाची संमिती होती. समितीकडून मंजूर करून घेण्याची जबाबदारी कायदामंत्री म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्यावर सोपवली त्यांनी त्यांचा सखोल अभ्यास केला आणि त्यामध्ये सुधारणा करून ज्या तरतुदी केल्या. त्यांनी स्त्री उद्धारासाठी, उन्नतीसाठी किती मोलाचे ठरले. स्त्रीमुक्ती,जातीसंस्था निर्मुलन, हिंदू कायद्यातील नियमाचे संहितीकरण करणे हे या बिलाचे महत्वाचे उद्धेश होते.

स्त्रीला घटस्फोट देण्याचा अधिकार हवा, नवऱ्याने घरे स्फोट दिल्यास पोटगी मिळायला हवी, व्यक्तीचा एकच विवाह कायदेशीर असल्याने दुसऱ्या विवाहास योग्य कारण नसल्यास त्यावर बंदी घालावी, ज्यामुळे स्त्रियांना स्थैर्य लाभले, स्त्रियांना दत्तक घेण्याचा अधिकार मिळावा, मुलाप्रमाणे मुलींनाही वडिलांच्या मिळगतीतील समान हिस्सा मिळायला पाहिजे, मिळायला पाहिजे, मुलींना वारस होण्याचा अधिकार हवा, आंतरजातीय विवाहास संमती हवी, स्त्रीला स्वतःचा वारस निश्चित करण्याचा अधिकार हवा. हिंदू कोडबिल हा हिंदू धर्मातील अन्यायाची, शोषणाची व विषमतेची परंपरा घालविण्यासाठी त्यांचा हा एक पराजप्रकारचा संघर्ष होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नारीमुक्तीसाठी लढणारे एक लढवय्ये शिपाई होते. महात्मा फुले यांचा वारसा त्यांच्या जवळ होता फुलेच्या कार्याची प्रेरणा आंबेडकरांच्या जवळ होती म्हणून ते आपल्या पत्नीला एका पत्रात म्हणतात " मी नारी उन्नतीसाठी व नारीमुक्तीसाठी लढणारा एक योद्धा आहे . स्त्रियांची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी आवश्यक तो संघर्ष केला, ज्याचा मला सार्थ अभिमान आहे. बाबासाहेबांनी या प्रयत्नात केवळ दलित स्त्रीच नजरेसमोर ठेवली नाही तर तमाम हिंदू स्त्रीच्या उद्धारासाठी हिंदू कोड बिलाची रचना केली होती.

**सारांश** प्राचीन काळापासून स्त्री वर्गाला उपेक्षित ठेवल्याने समाज ज्या गतीने विकास होणे गरजेची होती तितका झाला नव्हता. म्हणून डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी जाती अंतर्गत चळवळीबरोबर स्त्रियांची उन्नती आणि मुक्तीसाठी चळवळींना महत्व दिले होते. स्त्रियांची शोषण मुक्ती, स्त्री –पुरुष समतेसाठीचे त्यांचे कार्य प्रेरणादायी होते.

**संदर्भ सूची :**

1. आठवेलकर मंगला, "महापुरुषांच्या नजरेतून स्त्री", मेनला प्रकाशन पुणे 2009.
2. लिबले शरणकुमार, प्रजासुर्या, दिलीपराज प्रकाशन.
3. प्रा. प्रकाश पवार "डॉ. बाबासाहेब आंबेडकर", महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई 2023.